Epaper

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

महाराष्ट्र-गोवा टपाल परिमंडळाच्या विभाजनाला स्थगिती

(पान २ वर)



। शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १६० । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

Selected

'हा' 'देश' आता अमेरिकेच्या ताब्यात!

मुंबई : अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या ट्रूथ या सोशल माध्यमावरुन एक मोठी घोषणा केली आहे. ग्रीनलँडच्या सुरक्षेसंदर्भातील सर्व हक्क अमेरिकेने मिळवल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. अमेरिका, डेन्मार्क आणि ग्रीनलँडमध्ये करार झाल्याची घोषणा करताना ट्रम्प यांनी, "ग्रीनलँडमध्ये अमेरिकेला कायमस्वरूपी सुरक्षा अधिकार मिळाला आहे," असं म्हटलं आहे. ग्रीनलँडमध्ये अमेरिकेची लष्करी तळ उभारण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करणार असल्याचंही ट्रम्प यांनी नमूद केलं आहे. अमेरिकेच्या परवानगीशिवाय विरोधी देशांना ग्रीनलँडमध्ये लष्करी तळ उभारता येणार नाही किंवा गुंतवणूकही करता येणार नाही. सदर कराराला कोणतीही मुदत नसून तो 'अनंतकाळासाठी' असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. ग्रीनलँड हा अनेकांना स्वतंत्र देश वाटत असला तरी ग्रीनलँडचा भूभाग हा डेन्मार्कचा अर्धस्वायत्त प्रदेश आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांची टीका; शरद पवारांच्या पत्रावरही मांडली भूमिका

राहुल गांधींची मानसिकता अराजकतावादी!

जखम कपाळाला आहे आणि राहुल गांधी पट्टी गुडघ्याला बांधत आहेत

जन सम्राट टाईम्स

मुंबई । : "राहुल गांधींची मानसिकता अराजकतावादी आहे", अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. "भारतीयांनी राहुल गांधींचे नेतृत्व नाकारले आहे, हे ते मान्य करत नाहीत. जखम कपाळाला आहे आणि पट्टी गुडघ्याला बांधत आहेत", असेही फडणवीस म्हणाले. शरद पवारांनी लिहलेल्या पत्राबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आधीच उपाय योजना सुरु केल्याचे सांगितले. दुष्काळाची स्थिती राज्य सरकारने गांभीर्याने घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

वेस्टर्न ऑस्ट्रेलिया इंडिया विद्यापीठाच्या कॅम्पसचे शुक्रवारी (१८ सप्टेंबर) मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला. "नव्या शिक्षण प्रणालीमुळे विदेशी विद्यापीठांना देशात कॅम्पस सुरु करण्याची परवानगी मिळाली. या अंतर्गत सात विद्यापीठं महाराष्ट्रात आली आहेत. वेस्टर्न ऑस्ट्रेलिया इंडिया विद्यापीठात जागतिक दर्जाचे शिक्षण मिळेल शिवाय परकीय चलनाची देखील बचत होईल. विद्यापीठ संशोधनाचे केंद्र बनत असल्याने अर्थव्यवस्थेला देखील त्याचा फायदा होईल", असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



म्हणाले.राहुल गांधींनी शिवसेना, राष्ट्रवादी आणि तृणमूल काँग्रेसचे नाव आणि चिन्हाबाबत केलेल्या टीकेवरुन देवेंद्र फडणीवसांना प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना, "आपला पराभव लपवण्यासाठी आणि भारतीयांनी राहुल गांधींचे नेतृत्व नाकारले आहे, हे ते मान्य करत नाहीत. जखम कपाळाला आहे आणि पट्टी गुडघ्याला बांधत आहेत ही त्यांची समस्या आहे. भारतीय लोकांना काय हवंय? लोकं मोदींच्या मागे का आहेत? हे त्यांना कळेल, त्यादिवशी त्यांचं निवडणुकांमध्ये पराभव होणे थांबले किंवा त्याचा त्यांना काहीतरी फायदा होईल. राहुल गांधींची मानसिकता अराजकतावादी आहे", अशी टीका मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.भारतीय संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांना बदनाम करायचे, त्या संस्थांवरील लोकांचा विश्वास उडाला पाहिजे. आणि लोकांचा विश्वास उडाला की लोकशाहीवरचा विश्वास उडाला पाहिजे, आणि लोकशाहीवरील विश्वास उडाला की संविधानावरील विश्वासही उठला पाहिजे अशा प्रकारची मांडणी राहुल गांधी करत आहेत", अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.शरद पवारांनी लिहलेल्या पत्राबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, "राज्य सरकारने यापूर्वीच याबाबतचे निर्णय घेतलेले आहेत. गेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळ आणि संभाव्य मदतीच्या संदर्भात चर्चा झाली आहे. अगोदरच कर्जमाफीची योजना सुरु आहे. तीन याद्या झाल्यात, इतर याद्या करत आहोत. पात्र शेतकऱ्यांना मदत करणार आहोत. दुष्काळाच्या उपाययोजना देखील सुरु करत आहोत. तसेच, NDRF ची मदत मिळावी यासाठी ०५ ऑक्टोबरचे पंचनामे त्यांना देणार आहोत", असेही फडणवीस म्हणाले. "दुष्काळाची स्थिती राज्य सरकारने गांभीर्याने घेतली असून, चारा – पाण्याची सोय करण्यात आली आहे.

सात विद्यापीठं महाराष्ट्रात आली

वेस्टर्न ऑस्ट्रेलिया इंडिया विद्यापीठाच्या कॅम्पसचे शुक्रवारी (१८ सप्टेंबर) मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला. "नव्या शिक्षण प्रणालीमुळे विदेशी विद्यापीठांना देशात कॅम्पस सुरु करण्याची परवानगी मिळाली. या अंतर्गत सात विद्यापीठं महाराष्ट्रात आली आहेत. वेस्टर्न ऑस्ट्रेलिया इंडिया विद्यापीठात जागतिक दर्जाचे शिक्षण मिळेल शिवाय परकीय चलनाची देखील बचत होईल.

दिशा सालियनचे वडील मातोश्रीवर जाण्याच्या तयारीत, आदित्य ठाकरेंना तात्काळ अटक करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: दिशा सालियानचे वडील सतीश सालियान शनिवारी दुपारी चार वाजता ठाकरेंच्या मातोश्री निवासस्थानी जाणार आहेत. आदित्य ठाकरे यांनी दिशा सालियानप्रकरणी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टनंतर सतीश सालियान यांनी आदित्य ठाकरेआणि अनिल देशमुखांविरोधात अब्रुनुकसानीचा दावा ठोकला आहे. त्यासंदर्भातील नोटीस देण्यासाठी सतीश सालियान आज मातोश्री निवासस्थानी जाणार आहेत. तसेच आपल्या पोलीस संरक्षण देण्याची मागणीही त्यांनी केली. दरम्यान, सतीश सालियान यांनी मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग, बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे, आदित्य ठाकरे आणि इतरांना तात्काळ अटक करण्याची मागणी सीबीआयला लिहिलेल्या पत्रातून केली आहे. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी सीबीआयला पत्र लिहून मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग, बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे, शिवसेना (यूबीटी) आमदार आदित्य ठाकरे आणि इतरांना तात्काळ अटक करून पोलीस कोठडीत घेण्याची मागणी केली आहे. एफआयआरमध्ये आयपीसी कलम 409 जोडण्याची आणि कथित बलात्कार, हत्या, पुरावे नष्ट करणे आणि प्रकरण दडपण्याच्या संदर्भात प्रत्यक्षदर्शी व इतर महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदवण्याचीही मागणी केली आहे.

दिशा सालियन मृत्यू प्रकरणात आपल्याकडे पुरावे असल्याशिवाय अजिबात बोलू नका, असे स्पष्ट आदेश भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आपल्या नेते, पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. पुराव्यांशिवाय कोणत्याही विषयावर बोलणं



योग्य नाही असं त्यांनी बजावले आहे.दिशा सालियन प्रकरणात भाजपने तुर्तास सावध भूमिका घेतल्याचे दिसत आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आपल्या पक्षाच्या सहकाऱ्यांना यासंदर्भात महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. खरं तर आपल्या सर्वांनी एक गोष्ट लक्षात घेतली प्रत्येक कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी सगळ्यांनी आपण काय बोलावं आणि काय सांगावं, पुराव्याअभावी कधी बोलू नये. या सगळ्या गोष्टीमध्ये काही ज्याला म्हणतो की आपण एखादी गोष्ट जोपर्यंत आपल्याला पूर्णपणे माहित नाही किंवा आपल्याकडे त्याचे पूर्ण सक्षम पुरावे नाही तोपर्यंत बोलले गेलं नाही पाहिजे, असे रवींद्र चव्हाण यांनी म्हटले. दिशा सालियन ही अभिनेता सुशांत सिंग राजपूत याची मॅनेजर होती. 8 जून 2019 ला दिशा राहत असलेल्या इमारतीच्या 12 व्या मजल्यावरुन पडून तिचा मृत्यू झाला होता.

त्यानंतर 14 जून 2019 ला अभिनेता सुशांत सिंह राजपूत याने देखील आत्महत्या केली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानं दिशा सालियन मृत्यू प्रकरणी दिशाचे वडील सतीश सालियन यांच्या तक्रारीवरुन एफआयआर दाखल झाली आहे.आरोपी म्हणून एफआयआरमध्ये कोणाचं नाव नाही. एफआयआरमध्ये उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, दिनो मोरिया, रोहन रॉय, सूरज पांचोली, रिया चक्रवर्ती, शौविक चक्रवर्ती, सचिन वाझे, परमबीर सिंह यांच्यासह इतरांच्या नावाचा उल्लेख आहे.दिशा सालियन ही अभिनेता सुशांत सिंग राजपूत याची मॅनेजर होती.

8 जून 2019 ला दिशा राहत असलेल्या इमारतीच्या 12 व्या मजल्यावरुन पडून तिचा मृत्यू झाला होता. त्यानंतर 14 जून 2019 ला अभिनेता सुशांत सिंह राजपूत याने देखील आत्महत्या केली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानं दिशा सालियन मृत्यू प्रकरणी दिशाचे वडील सतीश सालियन यांच्या तक्रारीवरुन एफआयआर दाखल झाला आहे.आरोपी म्हणून एफआयआरमध्ये कोणाचं नाव नाही. एफआयआरमध्ये उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, दिनो मोरिया, रोहन रॉय, सूरज पांचोली, रिया चक्रवर्ती, शौविक चक्रवर्ती, सचिन वाझे, परमबीर सिंह यांच्यासह इतरांच्या नावाचा उल्लेख आहे.

लोड शेडिंगमुळं बळीराजा त्रस्त!

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: पावासाळा सुरु होऊन साधारण साडेतीन महिन्यांचा कालावधी होऊन गेला आहे. अद्यापही राज्यातील बहुतांश भागात पावसानं हजेरी लावल्याचं चित्र दिसत नाही. यामुळं शेतकऱ्यांची उभी पिकं करपू लागली आहेत. दुसऱ्या बाजूला ज्या शेतकऱ्यांकडे पाणी आहे, त्या शेतकऱ्यांना देखील पिकाला पाणी देण्यास अडचणी येत काहेत आहेत. कारण महावितरणकडून योग्य प्रमाणात, योग्य दाबात विजपुरवठा केला जात असल्याचे दिसत आहे. अशीच परिस्थिती धाराशिव जिल्ह्यातील आहे. लोडिंग शेडिंगमुळं शेतकरी त्रस्त आहेत. दिवस रात्र पीक जगवण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरु आहे. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, विजेचं वेळापत्रक नाही, पुरेशी लाईट मिळत नसल्याने विहीर बोरवेलच्या पाण्यावर पिकं जगवताना शेतकऱ्यांना कसरत करावी लागत आहे. रात्रभर शिवारात मोटरसायकलवर शेतकऱ्यांच्या फेऱ्या, तास दोन तासाला लाईट ट्रिप होत असल्याने मोठा त्रास सहन करावा लागतोय. ढगाळ वातावरण आणि पाणीपातळी खालावल्याने सोलरवर शेतीपंप चालत नसल्याचे दिसत आहे. शेतीकडे वळलेले तरुण निसर्ग आणि सरकार पुढे निराश झाले आहेत. पाऊस नसल्याने अगोदरच झोप उडाली त्यामध्ये लाईट नसल्याने झोप येत नसल्याचे चित्र दिसत आहे. लोड शेडिंग थांबवण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याची शरद पवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. दुष्काळ जाहीर करा अशी मागणी करत असताना शरद पवार यांनी रोहित्र दुरुस्तीसाठी विशेष मोहीम राबवण्याची मागणी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे. लोड शेडिंग मुळे शेतकऱ्यांना काय त्रास सहन करावा लागतो हे जाणून घेण्यासाठी एबीपी माझाची टीम रात्री शेतकऱ्याच्या बांधावर पोहोचली आहे.

लैगिंग छळाला आता माफी नाही... बीसीसीआयचा निर्णय!

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (BCCI) आज वार्षिक 95 वी बैठक पार पडली, या बैठकीचे आयोजन हे मुंबईमधील बीसीसीआयच्या मुख्य कार्यालयामध्ये करण्यात आले होते. या बैठकीमध्ये अनेक महत्त्वाचे टीम इंडिया महिला आणि पुरुष संघांबद्दल त्याचबरोबर आगामी आयपीएल 2027 चे मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. या सभेत नवीन नियुक्त्यांपासून ते आयपीएलच्या शताब्दी सोहळ्यापर्यंत आणि इतर आर्थिक बाबींपर्यंत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. आज झालेल्या या बैठकीचे एक प्रसिद्धीपत्रक शेअर केले आहेत आणि यामध्ये कोणते महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत यासंदर्भात सविस्तर वाचा. बीसीसीआयने इतर चार महत्त्वाच्या मुद्द्यावर देखील या बैठकीमध्ये चार महत्त्वाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करून त्यांना मंजुरी दिली. यामध्ये पहिला मुद्दा म्हणजेच पंच आणि सामनाधिकारी यांच्या वेतन वाढीचा मुद्दा. या मुद्द्याला श्रेणींच्या पुनर्वर्गीकरणास एकमताने मंजुरी देण्यात आली आहे, त्याचबरोबर बीसीसीआयने लैगिंग छळ प्रतिबंधक धोरणांतर्गत एक नवीन अंतर्गत समिती स्थापन करण्यात आली. बीसीसीआयच्या शताब्दी सोहळ्याची (100 वर्षे साजरी करण्याची) प्रक्रिया सुरू केली आहे. हा शताब्दी सोहळा डिसेंबर 2027 मध्ये सुरू होऊन 2028 पर्यंत वर्षभर चालणाऱ्या कार्यक्रमाद्वारे



साजरा केला जाईल आणि भारतीय क्रिकेटच्या इतिहासात एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल," असे एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. प्रसिद्धीपत्रकानुसार, सर्वसाधारण सभेच्या दोन प्रतिनिधींची आयपीएल नियामक परिषदेवर निवड झाली आहे. पहिले अरुण सिंग धुमिल, तर दुसरे एम. खैरुल जमाल मजुमदार आहेत. हे दोघेही आता आयपीएल नियामक परिषदेचे सदस्य असतील. सर्वसाधारण सभेचे 2 प्रतिनिधी (अरुण सिंग धुमल आणि एम खैरुल जमाल मजुमदार) यांची आयपीएलच्या नियामक मंडळात निवड झाली असून त्यांचा समावेश करण्यात आला आहे. सर्वसाधारण सभेने बीसीसीआयच्या 2025-26 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षित हिशेब विवरणपत्रास मंजुरी दिली. सर्वसाधारण सभेने 2026-27 या आर्थिक वर्षासाठीच्या वार्षिक अर्थसंकल्पाला मंजुरी दिली. आर्थिक वर्ष 2026-27 साठी लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्वसाधारण सभेने 2027 मध्ये आयपीएलची 20 वी आवृत्ती मोठ्या थाटामाटात साजरी करण्याचा निर्णय एकमताने घेतला. सर्वसाधारण सभेने 2028 मध्ये बीसीसीआयच्या शताब्दी सोहळ्याच्या (100 वर्षे पूर्ण झाल्याचा उत्सव) प्रक्रियेला सुरुवात केली आहे.शताब्दी सोहळा हा डिसेंबर 2027 मध्ये सुरू होऊन 2028 पर्यंत चालणारा वर्षभराचा कार्यक्रम असेल आणि तो भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

ED ची भीती वाटली, म्हणून जरांगे पाटोद्यात थांबले!

अमोल खुणेंचा सवाल, तर सामंतांनी डबल ढोलकी वाजवू नये म्हणत हल्लाबोल

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी: मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी तब्बल 20 दिवसानंतर उपोषण मागे घेतलं आहे. यानंतर विविध प्रतिक्रिया समोर येत आहेत. ईडीमुळे नाही तर सरकारच्या शिष्टमंडळामुळं जरांगेंनी उपोषण मागे घेतलं असं मंत्री उदय सामंत म्हणाले होते. यावर आता जरांगे पाटील यांचे जुने सहकारी अमोल खुणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पाटोद्यामध्ये ED ची भीती वाटली म्हणून जरांगे तिथेच थांबले. माझ्यासह 80 जणांना ED उचलणार होते, असे काळकुटे म्हणाले होते. यामुळं हे अंधारात शिष्टमंडळाच्या पाया पडल्याचे खुणे म्हणाले.29 ऑगस्ट रोजी मनोज जरांगे उपोषणाला बसले तेव्हा शिष्टमंडळ 15 दिवसांचा वेळ मागत होते. तेव्हा एक मिनिट देणार नाही असे जरांगे यांनी शिष्टमंडळाला सांगितले होते. पण, आता जरांगेंनी सरकारच्या शिष्टमंडळाला तीन महिन्याचा वेळ कसा काय दिला? असा सवाल अमोल खुणे यांनी मंत्री उदय सामंत यांना केला. मंत्री उदय सामंत डबल ढोलकी वाजवू नये असे अमोल खुणे म्हणाले. शिष्टमंडळाने काहीच दिलं नाही. पाटोद्यातून हे पुढे सरकले असते तर गंगाधर काळकुटे आणि श्रीराम कुरुंदकरला ईडी उचलणार होती. गंगाधर काळकुटेनी माझा कार्यक्रम लागला म्हणून सगळ्यांना फोन केले होते. गेवराई पर्यंत साधारण होता, गेवराईनंतर तंबाखूच्या पिचकारी मारल्या, गाड्या बाजूला काढण्यासाठी शिव्याही



दिल्या, ही एनर्जी कुठून येती? पब्लिक समोरच नाटकं केले धरायला चार जण असायचे, मराठ्यांचा इतिहास आहे, एवढ्या लढाया झाल्या, युद्ध झाले, एक तरी मावळा कुठल्या मोहिमेवर रडत गेला का? हा प्रत्येक लढाईला रडत जातो. खिंड लढवायला हा बाजीप्रभू लागून गेला का? हे नाटक कुठेतरी थांबलं पाहिजे असंही पुढे अमोल खुणे यांनी म्हटलं आहे. मी एवढं बोलतोय, सर्वच टीमवर, मनोज जरांगेवर. हे का माझ्यावर बोलत नाहीत? यांच्यात धमक नाही. मनोज जरांगे जर खरे असतील, तर मनोज जरांगेने माझ्यासमोर बसावं आता समोरासमोर बोलावं. मग मी सांगतो मनोज जरांगेने काय केलंय आणि मनोज जरांगेने सांगावं आता अमोलने काय केलंय. मी जर कुठे चुकीचा ठरलो, तर मला समाज जी शिक्षा देईल ती मी भोगायला तयार आहे आणि मनोज जरांगे जर चुकीचा ठरला, तर समाजाने जी शिक्षा दिली ती मनोज जरांगेने स्वीकार करावी असे खुणे म्हणाले. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी तब्बल 20 दिवसानंतर उपोषण मागे घेतलं आहे. यानंतर विविध प्रतिक्रिया समोर येत आहेत. ईडीमुळे नाही तर सरकारच्या शिष्टमंडळामुळं जरांगेंनी उपोषण मागे घेतलं असं मंत्री उदय सामंत म्हणाले होते. यावर आता जरांगे पाटील यांचे जुने सहकारी अमोल खुणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पाटोद्यामध्ये ED ची भीती वाटली म्हणून जरांगे तिथेच थांबले. माझ्यासह 80 जणांना ED उचलणार होते, असे काळकुटे म्हणाले होते. यामुळं हे अंधारात शिष्टमंडळाच्या पाया पडल्याचे खुणे म्हणाले.29 ऑगस्ट रोजी मनोज जरांगे उपोषणाला बसले तेव्हा शिष्टमंडळ 15 दिवसांचा वेळ मागत होते. तेव्हा एक मिनिट देणार नाही असे जरांगे यांनी शिष्टमंडळाला सांगितले होते. पण, आता जरांगेंनी सरकारच्या शिष्टमंडळाला तीन महिन्याचा वेळ कसा काय दिला? असा सवाल अमोल खुणे यांनी मंत्री उदय सामंत यांना केला. मंत्री उदय सामंत डबल ढोलकी वाजवू नये असे अमोल खुणे म्हणाले. शिष्टमंडळाने काहीच दिलं नाही. पाटोद्यातून हे पुढे सरकले असते तर गंगाधर काळकुटे आणि श्रीराम कुरुंदकरला ईडी उचलणार होती. गंगाधर काळकुटेनी माझा कार्यक्रम लागला म्हणून सगळ्यांना फोन केले होते.

आता 30 वर्षांनी अभिनेत्री मंदाकिनी यांनी मौन सोडलं

जन सम्राट टाईम्स

नागपूर | प्रतिनिधी: 'राम तेरी गंगा मैली' सिनेमाची अभिनेत्री मंदाकिनी आपल्या पहिल्याच सिनेमातून हिंदी सिनेसृष्टीच्या सुपरस्टार अभिनेत्री ठरल्या. पण, कधीकाळी त्यांच्या एका फोटोमुळे खळबळ माजलेली. अख्खी सिनेसृष्टी हादरवणारा तो फोटो आजही तितकाच चर्चेत असतो. आज कित्येत वर्षांनी त्याच फोटोबाबत अभिनेत्री मंदाकिनी यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही ज्या खळबळ माजवणाऱ्या फोटोबाबत बोलतोय, तो फोटो होता, अभिनेत्री मंदाकिनी आणि कुख्यात गँगस्टर दाऊद इब्राहिम मंदाकिनी आणि दाऊद यांना एकत्र पाहून भारतातील प्रत्येकाच्याच पायाखलची जमीन हादरली होती. नव्वदच्या दशकात मंदाकिनी यांनी एक फोटो समोर आली होती. ज्यामध्ये ती दाऊदसोबत दिसलेली. हा फोटो दुबईच्या शारजाह स्टेडियममधला होता. तिथे दाऊन आणि त्याच्यासोबत स्टार अभिनेत्री मंदाकिनी क्रिकेट सामना पाहताना दिसत होती. या फोटोवरुन खूप खळबळ माजलेली. अभिनेत्री मंदाकिनीनं ANI सोबत बोलताना स्पष्ट केलं की, त्यांचं दाऊदसोबत कोणतंही कनेक्शन नाही आणि ना त्यांना दाऊदनं बोलावलेलं. पुढे बोलताना त्यांनी सांगितलं की, कुणाला काहीही लिहायचंय, कुणाला काहीही बोलायचंय, आपण त्यांना थांबवू शकत नाही. एका कलाकाराला हजारो लोक भेटत असतात आणि त्या कलाकारालाही सर्वांसोबत सारखं वागावं लागतं. खूप लोक एकत्र होते, आपण कुणाला निवडायचं आणि कुणाला नाही? आम्ही तिथे दुबईला एका शोसाठी गेलेलो. मला दाऊदनं बोलावलं नव्हतं. मंदाकिनीनं सांगितलं की, तो एक फोटो व्हायरल झाल्यानंतर वाद एवढा वाढला की, त्यामुळे त्यांच्या करिअरवर त्याचा विचित्र प्रभाव पडला. त्यांनी म्हटलं की, "या वादामुळे खूप नुकसान झालेलं. त्यानंतर मला कळालं की, या सर्व गोष्टी सांभाळण्यासाठी एक टीम असायला हवी.

द्वारका नगर मित्र मंडळाने साकारला ‘पावनखिंड’चा थरारक ऐतिहासिक देखावा!

छत्रपती शिवाजी महाराज आणि बाजीप्रभूंच्या शौर्यगाथेने पंचक्रोशीत वेधले लक्ष

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद। प्रतिनिधी : शौर्य, त्याग आणि स्वराज्यनिष्ठेची प्रेरणा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्या ऐतिहासिक शौर्यगाथेची साक्ष देणारा ‘पावनखिंड’ हा थरारक ऐतिहासिक देखावा यंदा द्वारका नगर मित्र मंडळाच्या वतीने साकारण्यात आला आहे. द्वारका नगर व आण्णा नगर परिसरात उभारण्यात आलेला हा आकर्षक देखावा सध्या पंचक्रोशीत चर्चेचा विषय ठरत असून, नागरिकांकडून मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे. शौर्यगाथेतून तरुणाईला इतिहासाची प्रेरणा स्वराज्याच्या रक्षणासाठी बाजीप्रभू देशपांडे आणि बांदल सैनिकांनी पावनखिंडीत दिलेला पराक्रमी लढा मराठ्यांच्या इतिहासातील अत्यंत प्रेरणादायी प्रसंग मानला जातो. याच शौर्यगाथेची ओळख नव्या पिढीला व्हावी, इतिहासाबद्दल आस्था निर्माण व्हावी आणि तरुणांमध्ये देशप्रेम व स्वराज्याच्या विचारांची प्रेरणा रुजावी, या उद्देशाने मंडळाने यंदा ‘पावनखिंड’चा देखावा साकारला. देखाव्यामध्ये ऐतिहासिक प्रसंगाची मांडणी करण्यात आल्याने तो पाहताना नागरिकांना इतिहासातील त्या रोमहर्षक क्षणांची अनुभूती होत आहे. विशेषतः बालक आणि तरुणांमध्ये या देखाव्याबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे. पदाधिकाऱ्यांचे



मार्गदर्शन; कार्यकर्त्यांची मेहनत हा देखावा साकारण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष हेमंत दगडू तळेले, उपाध्यक्ष राहुल ज्ञानदेव चौधरी, खजिनदार दीपक जगदीश जाधव आणि सचिव ललित रवींद्र महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. देखाव्याची संकल्पना मंडळाच्या सर्व सदस्यांनी एकत्रितपणे आखली. भव्य देखावा प्रत्यक्षात उभा करण्यासाठी मंडळातील कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. ललित रवींद्र महाजन, कल्पेश प्रमोद पाटील, हिमांशू चौधरी, दीपक जगदीश जाधव, कमलेश पोपट नेहते, संजय नथ्थू नेहते, मनोज सुभाष पाटील, अक्षय कैलास महाजन, मोहित माळी, मयूर माळी, वेदांत पाटील, संदीप भागवत भोगे आणि परेश माळी यांच्यासह अन्य तरुण कार्यकर्त्यांनी देखावा साकारण्यासाठी विशेष योगदान दिले. नागरिकांकडून कौतुकाची थाप ‘पावनखिंड’चा देखावा पाहण्यासाठी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. ऐतिहासिक प्रसंगाचे प्रभावी सादरीकरण आणि तरुण कार्यकर्त्यांची मेहनत यामुळे देखाव्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. इतिहास केवळ पुस्तकात न राहता तो प्रत्यक्ष देखाव्याच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा मंडळाचा प्रयत्न विशेष लक्षवेधी ठरत आहे. शौर्य, त्याग आणि स्वराज्यनिष्ठेची प्रेरणा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्या ऐतिहासिक शौर्यगाथेची साक्ष देणारा ‘पावनखिंड’ हा थरारक ऐतिहासिक देखावा यंदा द्वारका नगर मित्र मंडळाच्या वतीने साकारण्यात आला आहे. द्वारका नगर व आण्णा नगर परिसरात उभारण्यात आलेला हा आकर्षक देखावा सध्या पंचक्रोशीत चर्चेचा विषय ठरत असून, नागरिकांकडून मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे. शौर्यगाथेतून तरुणाईला इतिहासाची प्रेरणा स्वराज्याच्या रक्षणासाठी बाजीप्रभू देशपांडे आणि बांदल सैनिकांनी पावनखिंडीत दिलेला पराक्रमी लढा मराठ्यांच्या इतिहासातील अत्यंत प्रेरणादायी प्रसंग मानला जातो.

महाराष्ट्र-गोवा टपाल परिमंडळाच्या विभाजनाला स्थगिती

जन सम्राट टाईम्स



जळगाव। प्रतिनिधी: महाराष्ट्र टपाल परिमंडळाचे मुंबई आणि नागपूर अशा दोन स्वतंत्र परिमंडळात विभाजन करण्याच्या प्रस्तावाला स्थगिती मिळाल्याने टपाल विभागातील कर्मचारी आणि ग्रामीण डाक सेवकांना दिलासा मिळाला आहे. या प्रस्तावाविरोधात जॉईंट ॲक्शन कमिटी ऑफ पोस्टल एम्प्लॉईज युनियन (महाराष्ट्र अँड गोवा सर्कल) आणि शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) दक्षिण मध्य मुंबईचे खासदार अनिल देसाई यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. ‘एक राज्य, एक टपाल परिमंडळ’ या पारंपरिक प्रशासकीय रचनेपासून महाराष्ट्रासाठी पद्धत वेगळी का, असा प्रश्न देसाई यांनी केंद्रीय संचारमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांना देसाई यांनी ७ सप्टेंबर रोजी पाठविलेल्या पत्रात उपस्थित केला होता. तसेच महाराष्ट्र टपाल परिमंडळाचे प्रस्तावित विभाजन तातडीने थांबविण्याची मागणी केली होती. विभाजनामुळे महाराष्ट्रातील टपाल सेवेची एकात्मिक कार्यप्रणाली, कर्मचारी व ग्रामीण डाक सेवकांच्या पदोन्नतीच्या संधी तसेच स्थानिक रोजगाराच्या संधींवर परिणाम होईल, असे टपाल कर्मचाऱ्यांचे म्हणणे होते. जॉईंट ॲक्शन कमिटीच्या प्रतिनिधींनी देसाई यांच्याकडे निवेदन करून याला विरोध करण्याची विनंती केली होती.राज्य पुनर्रचना कायदा, १९५६ नंतर टपाल परिमंडळाच्या सीमा राज्यांच्या भौगोलिक सीमांशी जोडण्याची पद्धत अवलंबिली गेली. प्रशासकीय कामकाजातील विलंब, प्रवास आणि निर्णयप्रक्रियेतील अडथळे दूर करण्यासाठी स्वतंत्र परिमंडळ निर्माण करण्याऐवजी विद्यमान प्रादेशिक पोस्टमास्टर जनरल यांना अधिक वैधानिक, आर्थिक आणि शिस्तभंगविषयक अधिकार देता येतील. त्यामुळे नव्या सर्कलसाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा उभारण्याचा खर्च टाळता येईल, असे अनिल देसाई यांनी सुचविले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

वुशुच्या आखाड्यात कृष्णा महाजनची विजयी झेप!



जन सम्राट टाईम्स

धरणगाव| प्रतिनिधी: जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर धरणगाव येथील इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा विद्यार्थी कृष्णा गोरख महाजन याने वुशु क्रीडा प्रकारात दमदार कामगिरी करत जिल्ह्यात आपला ठसा उमटविला आहे. जळगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर आयोजित जिल्हास्तरीय शालेय वुशु क्रीडा स्पर्धेत कृष्णाने १९ वर्षाखालील खुल्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगाव यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेत कृष्णाने आत्मविश्वासपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याने जिल्ह्यात अव्वल स्थान मिळवून विभागस्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली. कृष्णाच्या या यशामुळे इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एका मानाच्या यशाची भर पडली आहे. अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये असून, योग्य मार्गदर्शन व सातत्यपूर्ण सरावातून यश संपादन करता येते, हे कृष्णाने आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे. कृष्णाच्या यशामागे त्याचे सातत्यपूर्ण परिश्रम तसेच विद्यालयाचे ज्येष्ठ क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक डी. एन. पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कृष्णाने नियमित सराव करत आपल्या खेळात सातत्याने सुधारणा केली. कृष्णाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे चेअरमन डी. जी. पाटील, सचिव सी. के. पाटील, संचालक अश्विनकुमार पाटील, आशिषकुमार पाटील, प्राचार्या सुरेखा पाटील, उपप्राचार्य ए. एस. पाटील, पर्यवेक्षिका भारती पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने त्याचे अभिनंदन केले. जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकाची झेप घेतल्यानंतर आता विभागस्तरीय स्पर्धेतही कृष्णा महाजनकडून दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे. त्याच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी विद्यालयासह क्रीडाप्रेमींकडून शुभेच्छा दिल्या जात आहेत. जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर धरणगाव येथील इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा विद्यार्थी कृष्णा गोरख महाजन याने वुशु क्रीडा प्रकारात दमदार कामगिरी करत जिल्ह्यात आपला ठसा उमटविला आहे.

‘महिला विद्यार्थिनींसाठी सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन’

जन सम्राट टाईम्स



जळगाव| प्रतिनिधी: डिजिटल युगात ऑनलाइन व्यवहारांचे प्रमाण वाढत असताना सायबर फसवणुकीच्या घटनांनाही वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर महिलांमध्ये आणि विशेषतः विद्यार्थिनींमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (आयटीआय), जळगाव येथे महिला विद्यार्थिनींसाठी सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमादरम्यान स्नेहल पाटील, वैष्णवी पाटील, अक्षय पाटील आणि लोकेश पाटील यांनी महिला विद्यार्थिनींशी संवाद साधत सायबर फसवणुकीच्या विविध पद्धतींची माहिती दिली. OTP फसवणूक, QR कोडद्वारे होणारी फसवणूक, AI व्हॉइस कॉल, ऑनलाइन बँकिंग फसवणूक, बनावट कस्टमर केअर कॉल, फिशिंग लिंक आणि सोशल मीडिया फसवणूक याबाबत प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले. OTP, PIN शेअर करू नका! ऑनलाइन व्यवहार करताना कोणत्याही व्यक्तीसोबत OTP, PIN, पासवर्ड किंवा बँक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती शेअर करू नये, असा महत्त्वाचा संदेश यावेळी देण्यात आला. अनोळखी व्यक्तींकडून आलेल्या लिंकवर क्लिक करू नये, संशयास्पद संदेश किंवा कॉलला प्रतिसाद देताना सावधगिरी बाळगावी तसेच कोणतेही ॲप डाउनलोड करण्यापूर्वी त्याची अधिकृतता तपासावी, असेही सांगण्यात आले. सायबर खाते सुरक्षित ठेवण्यासाठी मजबूत आणि वेगळा पासवर्ड वापरणे तसेच Two-Factor Authentication (2FA) सुरू ठेवणे किती महत्त्वाचे आहे, याची माहितीही विद्यार्थिनींना देण्यात आली. Anti-Fraud App चे ॲक्टिवेशन यावेळी विकसित Anti-Fraud App चे ॲक्टिवेशन करण्यात आले. या ॲपचा वापर कसा करावा आणि डिजिटल फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी त्याचा उपयोग कसा होऊ शकतो, याबाबत विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली. उपक्रमाच्या शेवटी विद्यार्थिनींनी सायबर सुरक्षेशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित करून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. विद्यार्थिनींचा सक्रिय सहभाग आणि उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे जनजागृती उपक्रम प्रभावी ठरला. या उपक्रमासाठी डॉ. आर. बी. आमले यांचे मार्गदर्शन लाभले. डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थिनींमध्ये सायबर सुरक्षेची जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला.

१५० वर्षांची गौराई परंपरा आजही कायम दापोऱ्यात महालक्ष्मी मातेचे थाटामाटात आगमन!

५६ भोगांच्या नैवेद्याने भक्तिमय वातावरण

जन सम्राट टाईम्स



दापोरा । प्रतिनिधी: येथील श्री. भालचंद्र मुरलीधर गुरव यांच्या परिवारात गेल्या १५० वर्षांपासून अखंड सुरू असलेली महालक्ष्मी माता अर्थात गौराई पूजनाची परंपरा यंदाही मोठ्या श्रद्धा, भक्ती आणि उत्साहात जपण्यात आली. दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी महालक्ष्मी मातेचे थाटामाटात आगमन झाले. गौराई मातेच्या आगमनाने संपूर्ण परिसर भक्तिमय आणि मंगलमय वातावरणाने भारून गेला. पारंपरिक पद्धतीने महालक्ष्मी मातेची विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. मातेच्या दर्शनासाठी गावातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धापूर्वक दर्शन घेतले. पिढ्यान्पिढ्या जपली गेलेली ही परंपरा आजही त्याच श्रद्धा आणि भक्तिभावाने सुरू असल्याने दापोरा परिसरातील धार्मिक व सांस्कृतिक वारशाचे महत्त्व अधोरेखित झाले. ५६ भोगांचा नैवेद्य दि. १८ सप्टेंबर रोजी महाआरतीसह ५६ भोगांचा नैवेद्य महालक्ष्मी मातेला अर्पण करण्यात आला. यावेळी भाविकांनी महाआरती व महाप्रसादाचा लाभ घेतला. मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहिल्याने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या धार्मिक सोहळ्याचे आयोजन श्री. प्रकाश भालचंद्र गुरव, श्री. अनिल शंकरराव नाईक आणि श्री. शैलेश भालचंद्र गुरव यांनी केले. त्यांच्या पुढाकारातून गौराई मातेचा भक्तिमय सोहळा उत्साहात पार पडला. आज गौराई मातेचे विसर्जन दरम्यान, दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी महालक्ष्मी माता अर्थात गौराई यांचे विधिवत विसर्जन करण्यात येणार आहे. १५० वर्षांची परंपरा जपत भाविक भक्तिभावाने मातेचा निरोप घेणार आहेत.दापोरा, ता. जि. जळगाव : येथील श्री. भालचंद्र मुरलीधर गुरव यांच्या परिवारात गेल्या १५० वर्षांपासून अखंड सुरू असलेली महालक्ष्मी माता अर्थात गौराई पूजनाची परंपरा यंदाही मोठ्या श्रद्धा, भक्ती आणि उत्साहात जपण्यात आली. दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी महालक्ष्मी मातेचे थाटामाटात आगमन झाले. गौराई मातेच्या आगमनाने संपूर्ण परिसर भक्तिमय आणि मंगलमय वातावरणाने भारून गेला. पारंपरिक पद्धतीने महालक्ष्मी मातेची विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. मातेच्या दर्शनासाठी गावातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धापूर्वक दर्शन घेतले. पिढ्यान्पिढ्या जपली गेलेली ही परंपरा आजही त्याच श्रद्धा आणि भक्तिभावाने सुरू असल्याने दापोरा परिसरातील धार्मिक व सांस्कृतिक वारशाचे महत्त्व अधोरेखित झाले. ५६ भोगांचा नैवेद्य दि. १८ सप्टेंबर रोजी महाआरतीसह ५६ भोगांचा नैवेद्य महालक्ष्मी मातेला अर्पण करण्यात आला. यावेळी भाविकांनी महाआरती व महाप्रसादाचा लाभ घेतला.

भोणे येथे ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत नागरिकांची आरोग्य तपासणी

जन सम्राट टाईम्स



भोणे, ता. धरणगाव| प्रतिनिधी: गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत ‘तीसचा पल्ला, आरोग्याचा सल्ला’ हा आरोग्यविषयक उपक्रम उपकेंद्र भोणे, ता. धरणगाव येथे राबविण्यात आला. शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या या उपक्रमात नागरिकांची उच्च रक्तदाब, मधुमेह तसेच विविध आरोग्यविषयक तपासणी करण्यात आली. हा उपक्रम तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय चव्हाण यांच्या आदेशानुसार तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र साळवा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. छाया बोरसे व डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. यावेळी नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून उच्च रक्तदाब व मधुमेहासारख्या आजारांची लक्षणे, नियमित तपासणीचे महत्त्व आणि आरोग्याची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. वेळोवेळी आरोग्य तपासणी करून आजारांचे वेळीच निदान करणे आवश्यक असल्याचे आरोग्य कर्मचाऱ्यांनी सांगितले. या आरोग्य उपक्रमास समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. चंद्रकांत पाटील, आरोग्य सेवक नरेंद्र पाटील, आशा स्वयंसेविका व मदतनीस उपस्थित होते. आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. गणेशोत्सवासारख्या सार्वजनिक उत्सवाच्या काळात आरोग्य तपासणी व जनजागृतीचे उपक्रम राबविल्यामुळे नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होत आहे.

भवरखेडे येथे अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह!



जन सम्राट टाईम्स

भवरखेडे | प्रतिनिधी: धरणगाव तालुक्यातील भवरखेडे गावात गेल्या ६८ वर्षांपासून अखंड सुरू असलेली हरिनाम कीर्तन सप्ताहाची धार्मिक व सांस्कृतिक परंपरा यंदाही मोठ्या भक्तिभावाने जपली जाणार आहे. शुक्रवार, १९ सप्टेंबरपासून अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाला प्रारंभ होणार असून, सप्ताहाच्या निमित्ताने संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज हरिनामाचा गजर, हरिपाठ, भजन, कीर्तन, प्रवचन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटेपासूनच मंदिर परिसरात हरिपाठ, नामस्मरण आणि भजनाने भक्तिमय वातावरणाची निर्मिती होणार आहे.

सायंकाळच्या सत्रात नामवंत कीर्तनकार व प्रवचनकार संतविचार, अध्यात्म आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविणार आहेत. ‘राम कृष्ण हरी’च्या जयघोषाने सप्ताहादरम्यान भवरखेडे आणि परिसर दुमदुमून जाणार आहे. गेल्या अनेक दशकांपासून अखंड सुरू असलेल्या या परंपरेमुळे गावातील धार्मिक वातावरणासोबतच सामाजिक एकोपा आणि वारकरी संस्कृती अधिक दृढ होत असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. या सप्ताहात भवरखेडेसह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, वारकरी बांधव, भजनी मंडळे आणि ग्रामस्थांकडून विविध धार्मिक कार्यक्रमांची तयारी करण्यात आली आहे.

भाविकांसाठी आवश्यक सेवा-सुविधांची व्यवस्थाही करण्यात आली आहे. सप्ताहाची सांगता शनिवार, २६ सप्टेंबर रोजी होणार असून, समारोपाच्या दिवशी सायंकाळी गावातून भव्य पालखी सोहळा काढण्यात येणार आहे. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. ६८ वर्षांची अखंड परंपरा जपत भवरखेडे ग्रामस्थांनी श्रद्धा, वारकरी संस्कृती आणि सामाजिक एकतेचा अनोखा संगम जपला आहे. यंदाच्या सप्ताहामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

झाडाचा आसरा बेतला जिवावर! पिशोर परिसरात वीज कोसळून तिघींचा दुर्दैवी अंत

कवठाच्या झाडाखाली थांबले अन् काळाचा घाला; ‘घाटी’ रुग्णालयात उपचार सुरू

जन सम्राट टाईम्स

पिशोर। प्रतिनिधी : पावसापासून बचावासाठी झाडाचा घेतलेला आसरा सय्यद कुटुंबाच्या जीवावर बेतला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात पिशोरजवळील वाघुळखेडा शिवारात गुरुवारी (दि. १७ सप्टेंबर) दुपारी विजेच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसादरम्यान कवठाच्या झाडावर वीज कोसळून एकाच कुटुंबातील तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत अन्य तीन जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) उपचार सुरू आहेत. या घटनेने पिशोर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. वाघुळखेडा शिवारातील गट क्रमांक ७१ मध्ये सय्यद कुटुंबातील सदस्य शेतात काम करीत होते. गुरुवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास अचानक आकाशात ढग दाटून आले आणि विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. पावसाचा जोर वाढल्याने शेतात काम करणारे काही जण जवळच असलेल्या कवठाच्या झाडाखाली आसरा घेण्यासाठी थांबले. दरम्यान, दुपारी अडीच



वाजेच्या सुमारास अचानक प्रचंड आवाज करत त्याच झाडावर वीज कोसळली. विजेच्या तीव्र झटक्याने फरजाना हमीद सय्यद (वय ३८), तस्लिम मुक्तार सय्यद (वय ५०) आणि अल्पवयीन अलविरा हनिफ सय्यद (वय १६) यांचा जागीच मृत्यू झाला. तीन जण गंभीर जखमी वीज कोसळण्याच्या या घटनेत हाफिज खलील सय्यद (वय २५), अनिसा निसार सय्यद (वय ३५) आणि हमीदा सय्यद हमीद (वय ३२) हे तिघे गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तत्काळ रुग्णवाहिकेच्या मदतीने पिशोर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे वैद्यकीय तपासणीनंतर तीन महिलांना मृत घोषित करण्यात आले. गंभीर जखमी तिघांवर पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांकडून पंचनामा; तहसीलदारांनी घेतली भेट घटनेची माहिती मिळताच पिशोर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार दत्तू लोखंडे, दत्तात्रय मोरे, कौतिक सपकाळ आणि विजय भोटकर यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी पिशोर पोलिसांत अकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तहसीलदार सारिका भगत यांनी पिशोर येथे पोहोचून मृतांच्या तसेच जखमींच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. एकाच कुटुंबातील तिघींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

मलकापूर नगरपरिषदेच्या जन्म-मृत्यू विभागात सावळा गोंधळ?

योग्य माहिती देऊनही प्रमाणपत्रावर चुकीची नोंद? नागरिकांचा संतप्त सवाल

जन सम्राट टाईम्स

मलकापूर। प्रतिनिधी: जन्म-मृत्यू विभागातील कामकाज पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. नागरिकांकडून आवश्यक व योग्य माहिती देण्यात आल्यानंतरही संबंधित प्रमाणपत्रावर चुकीचा तपशील नोंदविण्यात आल्याचा प्रकार समोर आल्याने विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकारामुळे संबंधित नागरिकांमध्ये नाराजी असून, "चूक नेमकी कोणाची आणि त्याची जबाबदारी कोण घेणार?" असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. जन्म-मृत्यू प्रमाणपत्र हे नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे शासकीय दस्तऐवज आहे. शैक्षणिक प्रवेश, विविध शासकीय योजनांचा लाभ, प्रशासकीय कामकाज तसेच अनेक कायदेशीर प्रक्रियांमध्ये या प्रमाणपत्राची आवश्यकता भासते. त्यामुळे त्यावरील प्रत्येक नोंद अचूक असणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी योग्य माहिती दिल्यानंतरही प्रमाणपत्रावर चुकीचा तपशील नोंदविला जात असल्यास, नोंदणी प्रक्रियेतील पडताळणी आणि जबाबदारीचा मुद्दा ऐरणीवर येतो. योग्य माहिती दिली, तरी नोंद चुकीची कशी? संबंधित नागरिकाकडून योग्य माहिती आणि आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आली असल्याचे सांगितले जात असताना प्रमाणपत्रावर चुकीची नोंद कशी झाली, याचा खुलासा होणे गरजेचे आहे. माहिती स्वीकारताना तिची योग्य पडताळणी करण्यात आली होती का? नोंदणी करताना मानवी चूक झाली का? अथवा प्रशासकीय प्रक्रियेत काही त्रुटी राहिली का? असे प्रश्न या प्रकारामुळे उपस्थित झाले आहेत. चुकीची नोंद; मात्र फेऱ्या नागरिकांच्याच! प्रमाणपत्रावर चुकीची नोंद झाल्यानंतर ती दुरुस्त करण्यासाठी नागरिकांना पुन्हा नगरपरिषद कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागतात. आवश्यक कागदपत्रे सादर



करणे, संबंधित विभागाशी संपर्क साधणे आणि दुरुस्तीची प्रक्रिया पूर्ण होण्याची प्रतीक्षा करणे, या प्रक्रियेत नागरिकांचा वेळ आणि श्रम खर्ची पडतात. त्यामुळे प्रशासकीय नोंदीतील चुकीचा त्रास संबंधित नागरिकांनीच का सहन करावा, असा सवाल उपस्थित होत आहे.

जर नागरिकांनी योग्य माहिती दिल्यानंतर नोंदणी प्रक्रियेत चूक झाली असेल, तर संबंधित प्रकरणाची वस्तुस्थिती तपासून दुरुस्तीची प्रक्रिया शक्य तितकी सुलभ करणे आवश्यक ठरते. जन्म-मृत्यू नोंदींच्या अचूकतेवर प्रश्नचिन्ह जन्म-मृत्यू विभागाचा संबंध नागरिकांच्या अत्यंत महत्त्वाच्या दस्तऐवजांशी असल्याने तेथील कामकाजात अचूकता, पारदर्शकता आणि जबाबदारीला विशेष महत्त्व आहे. प्रमाणपत्रातील एका चुकीच्या नोंदीमुळे नागरिकांच्या पुढील शासकीय किंवा कायदेशीर प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात. त्यामुळे अशा प्रकारांकडे केवळ किरकोळ प्रशासकीय चूक म्हणून दुर्लक्ष न करता त्यामागील कारणांचा शोध घेणे गरजेचे आहे. प्रशासन दखल घेणार तरी कधी? मलकापूर नगरपरिषद प्रशासनाने संबंधित प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन नोंदीची तपासणी करावी, चुकीचा तपशील असल्यास तो नियमानुसार तातडीने दुरुस्त करण्यासाठी नागरिकांना सहकार्य करावे आणि चौकशीत निष्काळजीपणा आढळल्यास नियमानुसार जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी होत आहे. जन्म-मृत्यू विभागातील नोंदींची नियमित तपासणी केली जाते का? नागरिकांनी दिलेल्या माहितीची पडताळणी करण्याची नेमकी प्रक्रिया काय आहे? चुकीची नोंद झाल्यास दुरुस्तीची जबाबदारी कोणाची? तसेच भविष्यात अशा चुका टाळण्यासाठी प्रशासन कोणत्या उपाययोजना करणार आहे? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे नगरपरिषद प्रशासनाकडून मिळणे आवश्यक आहे. नागरिकांना अचूक प्रमाणपत्र मिळणे हा केवळ प्रशासकीय प्रक्रियेचा विषय नसून त्यांच्या शासकीय आणि कायदेशीर कामकाजाशी संबंधित महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे 'चूक कोणाची, जबाबदार कोण?' या नागरिकांच्या प्रश्नावर नगरपरिषद प्रशासन काय भूमिका घेते, याकडे आता मलकापूरकरांचे लक्ष लागले आहे. जन्म-मृत्यू विभागातील कामकाज पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. नागरिकांकडून आवश्यक व योग्य माहिती देण्यात आल्यानंतरही संबंधित प्रमाणपत्रावर चुकीचा तपशील नोंदविण्यात आल्याचा प्रकार समोर आल्याने विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकारामुळे संबंधित नागरिकांमध्ये नाराजी असून, "चूक नेमकी कोणाची आणि त्याची जबाबदारी कोण घेणार?" असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. जन्म-मृत्यू प्रमाणपत्र हे नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे शासकीय दस्तऐवज आहे. शैक्षणिक प्रवेश, विविध शासकीय योजनांचा लाभ, प्रशासकीय कामकाज तसेच अनेक कायदेशीर प्रक्रियांमध्ये या प्रमाणपत्राची आवश्यकता भासते. त्यामुळे त्यावरील प्रत्येक नोंद अचूक असणे आवश्यक आहे.

चक्रधर स्वामी अवतार दिन देशमुख महाविद्यालयात उत्साहात साजरा

जन सम्राट टाईम्स

भडगाव। (प्रतिनिधी): पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगाव येथे मराठी विभाग आणि जयंती-पुण्यतिथी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. अधिकराव पाटील यांनी केले. त्यांनी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या जीवनकार्याचा, तत्त्वज्ञानाचा आणि मानवतावादी विचारांचा परिचय करून देत त्यांच्या विचारांची आजच्या सामाजिक परिस्थितीतील उपयुक्तता स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयंती-पुण्यतिथी समितीचे प्रमुख प्रा. शिवाजी पाटील यांनी केले. यावेळी चक्रधर स्वामी यांच्या समतावादी, मानवतावादी आणि समाजप्रबोधनपर विचारांचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या कार्याची आणि विचारांची विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. आजच्या काळात सामाजिक समता, मानवता आणि बंधुभावाची मूल्ये रुजविण्यासाठी महापुरुषांच्या विचारांचे स्मरण आणि आचरण आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समता, मानवतावादी दृष्टिकोन आणि सांस्कृतिक वारशाविषयी जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरला. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सचिन हडोळतीकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मराठी विभाग आणि जयंती-पुण्यतिथी समितीने विशेष परिश्रम घेतले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

विज्ञान नाट्य महोत्सवात जि.प. शाळा कुऱ्हा हरदो प्रथम!



जन सम्राट टाईम्स

बोदवड | प्रतिनिधी : पंचायत समिती बोदवड अंतर्गत गटसाधन केंद्र आणि रोज पेटल्स इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय विज्ञान नाट्य महोत्सव २०२६-२७ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या स्पर्धेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कुऱ्हा हरदो यांनी 'AI : साधन, मित्र की धोका?' या विषयावर प्रभावी नाटिका सादर करत प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे शाळेची जिल्हास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी सौ. अनिता परमार होत्या. सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना सौ. परमार यांनी विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण करण्याबरोबरच अभ्यासासोबत त्यांच्या कलागुणांनाही वाव देणे आवश्यक असल्याचे सांगितले. यंदाच्या विज्ञान नाट्य महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना 'विज्ञान आणि समाज' ही होती. तालुक्यातील विविध शाळांमधील एकूण ११ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी 'AI : मित्र की धोका?', 'इलेक्ट्रिक वाहने', 'अंतराळातील मानवी वस्ती', 'महासागराचे पुनरुज्जीवन' आदी समकालीन व वैज्ञानिक विषयांवर नाटिका सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कुऱ्हा हरदो शाळेच्या विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा समाजजीवनावर होणारा परिणाम, त्याचे फायदे आणि संभाव्य धोके यावर आधारित नाटिका प्रभावीपणे सादर केली. विद्यार्थ्यांच्या अभिनयासोबतच विषयाची मांडणी आणि सामाजिक संदेश यामुळे या नाटिकेला प्रथम क्रमांक मिळाला. या यशासाठी शेलवड केंद्राच्या केंद्रप्रमुख प्रतिमा चौधरी, शिक्षण विस्तार अधिकारी हरी नानकर, ग्रेडेड मुख्याध्यापक गजानन कोठाळे यांचे मार्गदर्शन लाभले. श्रीमती कुमुदिनी माहुरे आणि डॉ. वैशाली संसारे यांनी नाटिकेच्या तयारीसाठी विशेष परिश्रम घेतले. शाळेतील शिक्षक सौ. पुनम वाघोदे, योगेश बोरोले, छाया बहुरूपे आणि नितीन लांडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी तालुका विज्ञान समन्वयक सौ. वनिता अग्रवाल, केंद्रप्रमुख अनिल जाधव, खंडारे सर, BRC विषयतज्ज्ञ सौ. संगीता शेळके, सौ. भारती पाटे, शाळेचे प्राचार्य अरविंद वाघ तसेच तालुक्यातील विज्ञान शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेचे पर्यवेक्षक म्हणून डॉ. वैशाली संसारे व सौ. प्रियंका पाटील यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कमोदिनी बडगुजर व सौ. राधिका जोशी यांनी केले, तर कु. साक्षी पालवे यांनी आभार मानले.

कोल्हे हिल्समध्ये पर्वतकर कुटुंबीयांकडे महालक्ष्मीचे उत्साहात आगमन!

निलेशकुमार पर्वतकर यांच्या निवासस्थानी भक्तिमय वातावरण

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: जळगाव शहरातील कोल्हे हिल्स परिसरात निलेशकुमार सुभाषचंद्र पर्वतकर यांच्या निवासस्थानी यंदाही महालक्ष्मीचे मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात आगमन झाले. महालक्ष्मीच्या आगमनानिमित्त पर्वतकर कुटुंबीय तसेच नातेवाईक आणि आप्तेष्टांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. महालक्ष्मीच्या आगमनानंतर धार्मिक विधी व पूजन करण्यात आले. यावेळी कुटुंबातील सदस्य, नातेवाईक तसेच आप्तेष्टांनी एकत्र येत महालक्ष्मीचे दर्शन घेतले. पारंपरिक श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आलेल्या या धार्मिक सोहळ्यामुळे पर्वतकर कुटुंबीयांच्या निवासस्थानी दिवसभर भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाच्या कार्यक्रमालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परिसरातील तसेच दूरवरून



आलेल्या नातेवाईक आणि आप्तेष्टांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महालक्ष्मीचे दर्शन घेतले आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. महालक्ष्मीच्या आगमनाचा हा सोहळा केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित न राहता कुटुंबातील स्नेहबंध अधिक दृढ करणारा ठरला. अनेक दिवसांनी नातेवाईक आणि आप्तेष्ट एकत्र आल्याने परस्परांमध्ये संवाद, भेटीगाठी आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे पर्वतकर कुटुंबीयांच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला. धार्मिक परंपरा जपत आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी परिवारातील सदस्य तसेच नातेवाईक आणि आप्तेष्टांचे सहकार्य लाभले. महालक्ष्मीच्या आगमनाने पर्वतकर कुटुंबीयांच्या निवासस्थानी श्रद्धा, भक्ती आणि कौटुंबिक स्नेहाचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

'समान काम, समान वेतन'साठी भडगाव न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे आंदोलन!

दंडावर काळ्या फिती बांधून शासनाच्या धोरणाचा निषेध

जन सम्राट टाईम्स

भडगाव । (प्रतिनिधी): 'समान काम, समान वेतन' या प्रमुख मागणीसह विविध प्रलंबित सेवाविषयक प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या आवाहनानुसार भडगाव येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. जळगाव जिल्हा न्यायालयाच्या धर्तीवर भडगाव तालुका न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी दंडावर काळ्या फिती बांधून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदविला. दि. १६ सप्टेंबरपासून कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले असून, दैनंदिन न्यायालयीन कामकाज सांभाळत त्यांनी काळ्या फिती बांधून मूक आंदोलन केले. आंदोलन शांततापूर्ण असले तरी कर्मचाऱ्यांमधील असंतोष आणि प्रलंबित मागण्यांबाबतचा रोष यावेळी स्पष्टपणे दिसून आला. प्रमुख मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष? न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी 'समान काम, समान वेतन' हे तत्त्व सर्व



संबंधित संवर्गांना तातडीने लागू करण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर वाढता कामाचा ताण आणि जबाबदाऱ्या लक्षात घेऊन सुधारित वेतनश्रेणी व भत्ते लागू करावेत, अनेक वर्षांपासून रखडलेले पदोन्नती तसेच सेवाविषयक प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. न्यायालयांमधील अनेक पदे रिक्त असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे रिक्त पदांची तातडीने भरती करून कर्मचाऱ्यांवरील कामाचा भार कमी करावा, अशीही मागणी आंदोलनाद्वारे करण्यात आली. १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा शासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेऊन सकारात्मक तोडगा न काढल्यास दि. १७ नोव्हेंबरपासून राज्यभरातील न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. न्यायालयीन प्रशासनाचा महत्त्वाचा आधारस्तंभ असलेल्या कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप झाल्यास न्यायालयीन कामकाजावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. दाव्यांशी संबंधित प्रशासकीय प्रक्रिया, साक्षी-पुराव्यांच्या नोंदी, रोजच्या तारखांशी संबंधित कामकाज तसेच जामीन अर्जांच्या प्रक्रियेलाही विलंब होण्याची शक्यता असून, त्याचा थेट परिणाम पक्षकार आणि वकिलांवर होऊ शकतो. त्यामुळे शासनाने आंदोलनाची दखल घेऊन न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर तातडीने चर्चा करून तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

शेळावे खुर्द येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांची सदिच्छा भेट

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी: तालुक्यातील शेळावे खुर्द येथे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पारोळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी सदिच्छा भेट देत गावातील गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गणेशभक्तांशी संवाद साधला. त्यांच्या भेटीमुळे ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या हस्ते जय बजरंग ग्रुप मित्र मंडळाच्या गणरायाची आरती करण्यात आली. आरतीनंतर गावाच्या वतीने पोलीस पाटील महेंद्र सांगळे आणि पोलीस पाटील राजेंद्र बिऱ्हाडे यांच्या हस्ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गोपनीय शाखेचे भूषण पाटील यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. यानंतर पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी गावातील दोन्ही गणेश मंडळांना भेट देऊन गणेशोत्सव शांततेत, शिस्तीत आणि उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले. गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित



ठेवण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे त्यांनी सांगितले. गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना उत्सवादरम्यान आवश्यक नियमांचे पालन करावे, नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, यासाठी मंडळांच्या कार्यकर्त्यांनी जबाबदारीने सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. गणेशोत्सव हा भक्ती, आनंद आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे. हा उत्सव शांतता, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा राखून साजरा करावा, असा संदेशही दीपक पाटील यांनी यावेळी दिला. या प्रसंगी गावातील ग्रामस्थ, गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस प्रशासनाच्या मार्गदर्शनामुळे गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांना गणेशोत्सव शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी सकारात्मक संदेश मिळाला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या सदिच्छा भेटीमुळे पोलीस प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यातील समन्वय, संवाद आणि आपुलकीचे वातावरण अधिक दृढ झाले. तालुक्यातील शेळावे खुर्द येथे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पारोळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी सदिच्छा भेट देत गावातील गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गणेशभक्तांशी संवाद साधला. त्यांच्या भेटीमुळे ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या हस्ते जय बजरंग ग्रुप मित्र मंडळाच्या गणरायाची आरती करण्यात आली.

शाळा सोडल्यानंतरही जन्मतारखेतील स्पष्ट चूक दुरुस्तीचा मार्ग मोकळा!

'शाळा सोडली आहे' या एकाच कारणावरून अर्ज नाकारता येणार नाही!

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी: शालेय अभिलेखातील जन्मतारीख, नाव, आडनाव किंवा अन्य नोंदींमध्ये झालेल्या स्पष्ट व दृश्य चुका दुरुस्त करण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली आहे. केवळ संबंधित विद्यार्थ्याने शाळा सोडली आहे, या कारणावरून दुरुस्तीचा अर्ज सरसकट नाकारता येणार नाही, असे न्यायालयीन निर्णयांमधून स्पष्ट झाले आहे. मात्र दुरुस्ती ही संबंधित नियम व निर्धारित प्रक्रियेच्या चौकटीतच होणे आवश्यक आहे. यासंदर्भात Janabai d/o Himmatrao Thakur विरुद्ध State of Maharashtra & Others या प्रकरणातील मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाच्या १७ ऑक्टोबर २०१९ रोजीच्या निर्णयाला विशेष महत्त्व आहे. या निर्णयात माध्यमिक शाळा संहितेतील कलम २६.३ व २६.४चा विचार करून, विद्यार्थ्याने शाळा सोडल्यानंतरही काही प्रकारच्या 'obvious mistakes' अर्थात स्पष्ट चुकांमध्ये नियमांच्या चौकटीत दुरुस्तीची प्रक्रिया शक्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले.



'शाळा सोडली' हे एकमेव कारण पुरेसे नाही न्यायालयासमोर अशा प्रकारची प्रकरणे आली आहेत, ज्यामध्ये शिक्षण अधिकाऱ्यांनी संबंधित व्यक्तीने शाळा सोडल्याचे कारण देत शालेय अभिलेखातील दुरुस्तीचा अर्ज नाकारला. मात्र उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, अर्जदार आता त्या शाळेत शिक्षण घेत नाही, हा एकटाच आधार घेऊन अर्ज फेटाळता येणार नाही. प्रथम मागितलेली दुरुस्ती ही न्यायालयाने स्पष्ट केलेल्या निकषांनुसार 'obvious mistake'च्या स्वरूपाची आहे की नाही, याचा विचार संबंधित प्राधिकरणाने करणे आवश्यक आहे. याच भूमिकेचा पुढील प्रकरणांमध्येही आधार घेण्यात आला आहे.

३० नोव्हेंबर २०२३ रोजीच्या एका आदेशात छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने स्पष्ट केले की, मागितलेली दुरुस्ती 'obvious mistake'च्या श्रेणीत येत असल्यास, अर्जदाराने शाळा सोडली आहे या कारणावरच निर्णय घेता येणार नाही. अधिकाऱ्यांना न्यायालयीन निर्णयाचे पालन करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने अलीकडील एका प्रकरणातही Janabai Thakur पूर्णपीठाच्या निर्णयाचा संदर्भ देत, संबंधित व्यक्ती शाळेत शिक्षण घेत नाही म्हणून अर्ज नाकारण्याची भूमिका योग्य नसल्याचे नमूद केले आहे. तसेच या पूर्णपीठाच्या निर्णयाचा अर्थ संबंधित शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी योग्य पद्धतीने समजून घेऊन त्याचे पालन करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. न्यायालयीन निर्णयाच्या विरोधात अशा प्रकारचे आदेश पुन्हा आढळल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाऊ शकते, असेही न्यायालयाने नमूद केले आहे.

भोणे येथे 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत आरोग्य तपासणी!

जन सम्राट टाईम्स

भोणे, ता. धरणगाव । प्रतिनिधी: गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत 'तीसचा पल्ला, आरोग्याचा सल्ला' हा आरोग्य तपासणी उपक्रम भोणे येथील उपकेंद्रात शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला. या उपक्रमात नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

विशेषतः उच्च रक्तदाब व मधुमेहाची तपासणी करून नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. मा. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय चव्हाण यांच्या आदेशानुसार तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र साळवा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. छाया बोरसे आणि डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. बदलती जीवनशैली, वाढता ताण आणि आहाराच्या सवयी यामुळे उच्च रक्तदाब व मधुमेहासारख्या आजारांचा धोका वाढत आहे. त्यामुळे नियमित आरोग्य तपासणी करून आजारांचे वेळीच निदान करणे आवश्यक आहे. या उद्देशाने 'तीसचा पल्ला, आरोग्याचा सल्ला' या उपक्रमातून नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली. या उपक्रमासाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. चंद्रकांत पाटील, आरोग्य सेवक नरेंद्र पाटील, आशा स्वयंसेविका तसेच मदतनीस उपस्थित होते. आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी नागरिकांची तपासणी करून आवश्यक आरोग्यविषयक सूचना दिल्या. गणेशोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक उत्सवासोबतच आरोग्यविषयक जनजागृती आणि सेवा उपक्रम राबविण्यात आल्याने नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले.



गणेशोत्सवाची जोरात धामधूम सुरू आहे. गणेशोत्सवात मोठा उत्साह असतो. प्रत्येक गावांत, शहरातील गल्ली गल्लीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सर्जनशील आणि आकर्षक सजावटीसह गणेशोत्सव साजरा करतात.पुणे तसेच मुंबई, कोकणातील काही गणेश मंदिरे आहेत ज्यांचा गणेशोत्सव फार वेगळा आणि पाहण्यासारखा असतो. अशा या 8 प्रसिद्ध गणेश मंदिरांना आवश्य भेट द्या. या 8 गणेश मंदिरांविषयी विशेष माहिती खास वाचकांसाठी...



पुण्यातील कसबा गणपती-

पुण्यातील ज्या ठिकाणी गणेशोत्सव सुरू झाला. सर्वांचा पहिला मानाचा (पूज्य) गणेश म्हणजे कसबा गणेशोत्सव मंडळाचा कसबा गणपती. पुण्यातील सर्व गणपतींच्या महत्त्वाच्या यादीत हा सर्वात वरच्या स्थानी आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांनी 1639 मध्ये बांधलेले हे गणेश मंदिर 10 व्या दिवशी विसर्जन करण्यात येतो. कसब्यानंतरच इतर सर्व मंडळे आपापल्या उत्सवात पुढे जातात. किंबहुना, या गणेशाचे महत्त्व इतके आहे की, महापौर स्वत: पूजेला जातात.

केसरीवाडा गणपती-



शेवटचा पण सर्वात कमी मानाचा गणपती म्हणजे केसरीवाडा गणपती. 1894 मध्ये स्वतः बाळ टिळकांनी वसाहतवाद्यांच्या विरोधात जनतेला एकत्र आणण्याचा मार्ग म्हणून एक सुरुवात केली, त्यांनी आतापर्यंतची सर्वात यशस्वी क्रांती सुरू केली. केसरीवाडा आजही, ट्रस्ट सजावटीवर कमी आणि लोकांना एकत्र आणणाऱ्या आणि बंधुत्वाची भावना निर्माण करणाऱ्या विविध उपक्रमांवर जास्त खर्च करते. हा एक पाहण्यासारखा देखावा आहे.

तांबडी जोगेश्वरी गणपती -



पुण्याचा दुसरा मानाचा (पूज्य) गणपती म्हणजे तांबडी जोगेश्वरी. 15 व्या शतकात बांधलेले हे मूळत: दुर्गा देवीचे मंदिर आहे. गणेशमूर्तीचे विसर्जन केले जाते आणि त्यानंतर सलग वर्षभर इतर गणेश मंदिरांप्रमाणे त्याची स्थापना केली जाते. सजावट इतकी सुंदर असते की, खरोखरच पाहून तुमचे मन प्रसन्न होईल.

सिद्धिविनायक गणपती-



आर्थिक राजधानीचा सर्वात प्रसिद्ध गणपती, प्रभादेवी, मुंबई येथे आहे. भारतातील सर्वात श्रीमंत मंदिरांपैकी एक, त्याचा गणेशोत्सव उत्सव पाहून तुम्ही खुश व्हाल. कारण त्यांची असलेली सुंदर वास्तुकला पाहिल्यानंतर निश्चितच फायदेशीर ठरेल.

गुरुजी तालीम गणपती-



पुण्याचा तिसरा मानाचा गणपती, तो 1887 मध्ये भिकू शिंदे आणि उस्ताद नलबान या हिंदू आणि मुस्लिम कुटुंबांनी बांधले होते. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्याआधी त्याची स्थापना केल्यामुळे या मंदिराला सर्वात जुन्या मंदिरांपैकी एक असल्याचा मान मिळाला.

दगडूशेठ हलवाई-



पुण्याला भेट द्यायलाच हवी, हे पूर्वेकडील ऑक्सफर्डचे सर्वात श्रीमंत गणेश मंदिर आहे. मूर्ती सोन्याने मढवली असून मंदिरात सर्वत्र श्रीमंती दिसून येते. दगडूशेठ गणपतीचा तब्बल 10 दशलक्ष रुपयांचा विमा उतरवला आहे!!!

गं गणपतये नमः

तुळशीबाग गणपती-



पुण्याच्या मध्यभागी असलेला हा शहरातील चौथा मानाचा गणपती आहे. शहराच्या मध्यभागी असल्यामुळे सर्वात जास्त भेट दिलेल्या गणेश मंदिरापैकी एक असल्याचा अभिमान बाळगण्याचा अधिकार मिळतो. येथील विधी तुम्हाला थक्क करून सोडतील.

गणपतीपुळे गणपती-



गणपतीपुळे हे कोकण विभागातील रत्नागिरी जिल्ह्यात वसलेले एक छोटे शहर आहे, ज्यामध्ये प्राचीन समुद्रकिनारे आहेत. व्यस्त दैनंदिन जीवनापासून दूर जाण्यासाठी आणि शहराच्या गजबजाटातून आणि आपल्या कुटुंबासह, मित्रमैत्रिणींसोबत किंवा आपल्या जोडप्यासह नैसर्गिक सौंदर्यादरम्यान दर्जेदार वेळ घालवण्यासाठी हे लहान समुद्रकिनारा शहर योग्य ठिकाण आहे.